दिव्य मराठी
दिव्य सिटी
सोलापूर. रविवार, २ सप्टेंबर २०१८

# कामगारांच्या मुलांनी प्रशासकीय सेवेत यावे : पालकमंत्री



कामगार मुलांसाठी स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी प्रशिक्षणाचे उद्‌घाटन करताना पालकमंत्री विजयकुमार देशमुख आदी.

प्रतिनिधी । सोलापूर

कामगारांच्या मुलांनी स्पर्धा परीक्षेतून प्रशासकीय सेवेत यावे, असे आवाहन पालकमंत्री तथा कामगार राज्यमंत्री विजयकुमार देशमुख यांनी येथे केले. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी प्रशिक्षण आयोजित केले आहे. त्याच्या उद्‌घाटन कार्यक्रमात ते बोलत होते.

लक्ष्मी हायड्रोलिक्सचे व्यवस्थापकीय संचालक शरदकृष्ण ठाकरे, ज्येष्ठ व्याख्याते जयंत करंदीकर, लक्ष्मीकांत गड्डम यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी बोलताना श्री. देशमुख यांनी कामगार पाल्यांच्या कल्याणकारी योजना राबवताना निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही दिली.

मंडळातर्फे राज्यस्तरीय समरगीत, स्फूर्तिगीत स्पर्धेचे आयोजन केले होते. हुतात्मा स्मृती मंदिरात झालेल्या या स्पर्धेसाठी राज्यभरातील २३० स्पर्धक आले होते. विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरवण्यात आले. कल्याण आयुक्त सतीश दाभाडे यांनी स्वागत केले. दीपक कलढोणे, संतोष कोथळीकर, स्मिता देशपांडे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. ज्योती वाघमारे यांनी सूत्रसंचालन केले. घनश्याम कुळमेथे यांनी आभार मानले.